दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २ रे || अंक २२९ || रविवार ०४ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## श्री शिवरायांच्या पुतळ्याची दर रविवार होते नित्य पुजा!

सोलापूर : ( सैफन शेख ) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची नित्य पुजा दर रविवार गेल्या २०ते २५ वर्षापासून केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा उपक्रम होतो. नित्य पुजेवेळी एमडीन्यूजचे संपादक सैफन शेख यांच्या निभिड व प्रामाणिकपणे पत्रकारिता केल्याबद्दल त्यांचा संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रकाश ननवरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी मराठा सेवा संघचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव पवार, जिल्हा सचिव प्राध्यापक लक्ष्मण महाडिक, सचिन चव्हाण, माजी मुख्याध्यापक लिंबराज जाधव, वधू वर कक्षाचे शहराध्यक्ष श्रीराम माने, प्रदीप कळंब, श्याम जाधव, प्रकाश डोंगरे, पृथ्वीराज चव्हाण, भोसले आदी मान्यवरांसह मावळे मोठ्य संख्येने उपस्थित होते. दर रविवार जिजाऊ वंदना नंतर शिवचरित्राचे व बहुजन महापुरुषांचा चरित्राचे वाचन करण्यात येतो.

## जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ च्या ८५७ कोटी मंजूर निधीच्या कामांचे प्रस्ताव शासकीय यंत्रणांनी तात्काळ द्यावेत - पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सोलापूर - जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये सर्वसाधारण ७०२ कोटी, अनुचित जाती उपयोजना १५१ कोटी व आदिवासी उपयोजना साठी ४ कोटी २८ लाख असे एकूण ८५७ कोटी २८ लाख निधी मंजूर आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत निविदा प्रक्रिया राबवून जास्तीत जास्त विकास कामांचे कार्यारंभ आदेश दिले गेले पाहिजेत, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री श्री. पाटील बोलत होते. यावेळी खासदार सर्वश्री ओमप्रकाश राजे निंबाळकर, धैर्यशील मोहिते पाटील, प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले-तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, उपायुक्त नियोजन संजय कोलगणे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहायक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.




पालकमंत्री श्री पाटील पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी व नियोजन समिती सदस्यांनी मंजूर निधी अंतर्गत विविध विकासात्मक कामाचे प्रस्ताव दिनांक १० ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रशासकीय यंत्रणांकडे सादर करावेत. महाराष्ट्र विधानसभा आचारसंहिता १५ ते २० सप्टेंबर २०२४ दरम्यान लागण्याची शक्यता आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी जास्तीत जास्त कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत त्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही अत्यंत गतीने करावी, असेही त्यांनी सूचित केले.

## छत्रपती संभाजीनगर, धाराशिवच! नाव बदलण्याच्या निर्णयात हस्तक्षेप नाही; सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट निर्वाळा

मुंबई : औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव नामांतर करण्याच्या निर्णयात कोणताही हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. यासंदर्भात दाखल करण्यात आलेली याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.राज्य सरकारने औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्या. देवेंद्र उपाध्याय आणि न्या. आरिफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली. मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारचा निर्णय वैध ठरवून या विरोधातील सर्व याचिका फेटाळल्या. त्यानंतर शेख मसूद इस्माईल शेख यांच्यासह इतरांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.न्या. ऋषिकेश रॉय आणि न्या. एस.व्ही. एन. भट्टी यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली. खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय तर्कसंगत असल्याचे स्पष्ट केले. अशा प्रकरणांमध्ये वेगवेगळी मतमतांतरे असू शकतात. त्या भागात राहणार्या काही लोकांची सहमती आणि असहमती असू शकते. अशी प्रकरणे न्यायिक समीक्षेच्या चौकटीत सोडवण्यात यावीत का? असा सवाल करत राज्य सरकारला शहराचे नाव बदलण्याचा अधिकार आहे आणि त्यात आम्ही हस्तक्षेप करण्याचे कारण नाही, असे निरीक्षण नोंदवले.



दोन्ही शहरांचे नाव बदलण्यासाठी करावी लागणारी बहुतेक सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

२९ जून २०२१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर गद्दारी करून सत्तेवर आलेल्या मिंधे सरकारने या निर्णयाला स्थगिती दिली. महिनाभरातच मिंधे सरकारने १६ जुलै २०२२ रोजी तत्कालीन सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करत छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव अशा नामांतराचा प्रस्ताव मंजूर केला.

## पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेसाठी २९८९ उमेदवार पात्र; २६२ जागा, दहा ऑगस्टला परीक्षा

पिंपरी : शहर पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदांच्या २६२ जागांसाठी मैदानी चाचणी पूर्ण झाल्यानंतर आता दहा ऑगस्ट रोजी लेखी परीक्षा होणार आहे. ताथवडे येथील श्री बालाजी विद्यापीठात सकाळी दहा वाजता ही परीक्षा होणार आहे. त्यासाठी २९८९ उमेदवार पात्र ठरले आहेत. तर, मैदानी चाचणीत १२ हजार उमेदवार बाहेर पडले आहेत.



पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात २६२ शिपायांच्या जागा भरल्या जाणार आहेत. त्यामध्ये सर्वसाधारण उमेदवारांसाठी ७९, महिला ७८, खेळाडू १५, प्रकल्पग्रस्त १४, भूकंपग्रस्त चार, माजी सैनिक ४१, अंशकालीन पदवीधर ११, पोलीस पाल्य सात, गृहरक्षक दल १३ आणि अनाथांसाठी तीन जागा राखीव आहेत. भरतीप्रक्रियेत १९ जून ते ११ जुलै दरम्यान शारीरिक चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून १:१० प्रमाणात उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलावले आहे. त्या उमेदवारांची शंभर गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी लेखी परीक्षेत किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. ४० टक्क्यांहून कमी गुण मिळवणारे उमेदवार अपात्र समजले जातील.

मैदानी चाचणीतून १२ हजार उमेदवार बाहेर२६२ जागांसाठी राज्यभरातून १५ हजार ४२ अर्ज आले. त्यामध्ये वकील, डॉक्टर, अभियंत्यांसह पदव्युत्तर पदवीधारकांचादेखील समावेश होता. मात्र, मैदानी चाचणीत उत्तीर्ण होऊन लेखीसाठी २९८९ उमेदवार पात्र ठरले. उर्वरित १२ हजार ५३ उमेदवार मैदानी चाचणीमधून बाहेर पडले.

## अनगरच्या अप्पर तहसील कार्यालयाबाबत कसलेच स्थगिती आदेश नाहीत

सोलापूर : अनगरला अप्पर तहसील कार्यालय मंजूर असून अनगर येथे कार्यालय सुरू करण्यासाठी जिल्हा प्रशासन आता पुढाकार घेणार आहे. कार्यालयाला विरोध सुरू असून हा विषय आता मुख्यमंत्र्यांसमोर गेला आहे. मुख्यमंत्र्यांनी अप्पर तहसील कार्यालयाला तात्पुरती स्थगिती दिली असून याबाबत जिल्हाप्रशासनाला माहिती नाही. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना विचारले असता त्यांनी शासनाकडून स्थगितीसंदर्भात कोणतेही आदेश मिळालेले नाहीत असे सांगितले.



जोपर्यंत शासनाकडून स्थगितीसंदर्भात अधिकृत आदेश येणार नाही, तोपर्यंत स्थगितीची कार्यवाही होणार नाही. त्यामुळे पूर्वीच्या आदेशाप्रमाणे अनगरला आम्ही अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यासाठी लवकरच कार्यवाही सुरू करणार आहोत, त्यानुसार पदांची निर्मिती करू असेही त्यांनी सांगितले. अशी माहितीदेखील जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

मोहोळ तालुक्यातील तहसीलदारांशी चर्चा करून जिल्हाधिका-यांनी अनगर येथे उपलब्ध जागा किंवा इमारत नवीन अपर तहसील कार्यालयासाठी कार्यान्वित करावी, अप्पर कार्यालयासाठी मोहोळ तहसीलदार व पुणे विभागातून एक अप्पर तहसीलदार,

एक नायब तहसीलदार, एक अव्वल कारकून, तसेच चार महसूल सहायक लिपिक अशी एकूण सात पदे उपलब्ध करून द्यावीत अशी सूचना उपसचिवांच्या पूर्वीच्या आदेशात केली. नवीन पदांची नियुक्ती होईपर्यंत मोहोळ तहसील कार्यालयातील सात अधिकारी व कर्मचारी नवीन अप्पर तहसील कार्यालयात कार्यरत राहतील असे पूर्वीच्या आदेशात म्हटले होते.

## मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांची कसरत

सोलापूर : रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागते. असे चित्र सोलापूर शहरातील सर्वच चौकात सर्रासपणे दिसून येत आहे. सोलापूरच्या प्रवेशद्वारापासूनच शहरात मोकाट जनावरांचा वावर वाढल्याचे चित्र दिसून येते. शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडीची समस्या ही निर्माण होत आहे. शिवाय भर रस्त्यात अनेकदा या जनावरांची आपसातल्या भांडणांमुळे छोटे मोठे अपघात होऊन अनेकांना दुखापत अन् वाहनांचे नुकसान होत आहे. शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांवर जनावरे सर्रासपणे वावरताना दिसताहेत. त्यामुळे वाहनधारकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतोय.



छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रेल्वे स्टेशन चौक, सात रस्ता परिसर, गुरुनानक चौक, टिळक चौक, मधला मारुती, सम्राट चौक, रूपाभवानी रोड, मार्केट यार्ड परिसर, परिसर, अशोक चौक, विजापूर वेस, आसरा चौक, सैफुल, दमाणी नगर, लक्ष्मी मंडई परिसर आदी चौकात मोकाट जनावरे सर्रासपणे दिसून येतात. शहरात सध्या मोकाट जनावरांसोबतच मोकाट कुत्रे, गाढवांचाही वावर वाढला आहे. या जनावरांमुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सोलापूर शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर आहे, आठ ते दहा ठिकाणी ही जनावरे रस्त्यातच ठाण मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनधारकांना आपली वाहने चालविताना दुचाकीस्वारांना तर कधी चुकवत तर कधी वळसा मारूनच जावे लागते. बऱ्याच वेळा अशा मोकाट जनावरांमुळे वाहतूक विस्कळीत, ठप्प झाल्याचे तसेच अपघात झाल्याचे दिसून येते.

सूर्योदय
रविवार ०४ ऑगस्ट २०२४

संपादकीय

# पूररेषा हटवावी

पुण्यासह काही शहरांमध्ये अलीकडच्या काही दिवसांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे सामान्यांचे अतोनात हाल झाले. खरे तर त्यांचे असे हाल गेली काही वर्षे दर पावसाळ्यात सातत्याने होतच आहेत. शहरांमध्ये प्रचंड वेगाने होत असलेली बेसुमार बांधकामे, नद्यांच्या प्रवाहांशी केलेली छेडछाड, वृक्षतोड आणि तथाकथित विकासाचा अनाठायी सोस ही कारणे त्यामागे आहेत. शहर नियोजन ही गांभीर्याने करायची गोष्ट आहे, हे आपण कधी समजून घेणार आहोत?

मुंबई–ठाण्याच्या दिशेने झेपावणारा समृद्धी महामार्ग, गुजरातपासून नवी मुंबईच्या जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत निर्माणाधीन असलेला बडोदा-मुंबई मार्ग, मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन, विरार–अलिबाग कॉरिडॉर, नवी मुंबई विमानतळ याशिवाय अनेक लहान–मोठे उड्डाणपूल, उन्नत मार्ग, बोगद्यांची कामे रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांमध्ये सुरू आहेत. नवी शहरे, नव्या प्रकल्पांसाठी केले जाणारे शेकडो एकर जमिनींचे संपादन, भातशेतींच्या जमिनीवर सुरू असलेला दगड, माती, काँक्रीटचा भराव, लहान टेकड्या कापून सपाट झालेल्या जमिनीवर उभे केले जाणारे प्रकल्प आणि कसलाही धरबंध नसल्याप्रमाणे खाडी, नदी, नाले बुजवून वाड्या, वस्त्या, गाव, शहरांमध्ये उभी रहाणारी बेकायदा बांधकामे यामुळे मुंबईलगत असलेल्या महानगरांच्या प्रदेशाला दरवर्षी महापुराचा फटका बसू लागला आहे.

अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आले आणि महानगर प्रदेशासह ठाणे जिल्हा विकासाच्या केंद्रस्थानी आला. मुंबई महानगर विकास प्राधिकरण, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, सिडको यासारख्या शासकीय संस्थांनी अक्षरश: हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प या भागात आखण्यास सुरुवात केली. महानगर प्रदेश प्राधिकरण हे मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागाचा महत्त्वाचा भाग. त्यामुळे अलिबागपासून, पालघरपर्यंत जेथे मोकळी जमीन दिसेल तेथील विकासाचे अधिकार या प्राधिकरणाकडे सोपविण्याचा सपाटाच सुरू झाला. नवे रस्ते, बोगदे, पूल, उड्डाणपूल, उन्नत, खाडी, भुयारी मार्ग यासाठी सव्वादोन लाख कोटींचे प्रकल्प राज्य सरकारने ठाणे आणि आसपासच्या प्रदेशात आखले आहेत. यासाठी मिळेल तेथील, मिळेल तितकी जमीन संपादित करायची आणि गावागावांच्या वेशीवर अवाढव्य प्रकल्प करायचा असा शिरस्ताच या भागात सुरू आहे. .

पूरवाहिनी नदी

ठाणे जिल्ह्यातून वाहणाऱ्या उल्हास नदी किनारी गेल्या काही वर्षांत अमर्याद बांधकामे उभी राहिली आहेत. त्यामुळे बदलापूर अलीकडे पूरग्रस्त शहर ठरले आहे. या शहरात अनिर्बंध पद्धतीने नाले अडवले गेले. नैसर्गिक नाल्यांचे मार्ग बदलण्यात आले. काही ठिकाणी ते अरुंद करून तिथे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे दरवर्षी एक ते दोन दिवस बदलापूर शहरातील हजारो घरे पाण्याखाली जातात. त्यानंतरही स्थानिक बांधकाम व्यावसायिक जे लोकप्रतिनिधीही आहेत, पूररेषा हटवावी अशी मागणी राज्याच्या प्रमुखांकडे करण्यासाठी सातत्याने कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत.

भातशेती गिळली

ठाणे जिल्ह्यात सध्या नागपूर–मुंबई समृद्धी महामार्ग आणि उरण–वडोदरा महामार्गाची उभारणी अंतिम टप्प्यात आहे. त्याच्या उभारणीसाठी अंबरनाथ, कल्याण, शहापूर आणि भिवंडी तालुक्यांतील जमीन भूसंपादित करण्यात आली आहे. यात बहुसंख्य जमिनी या शेतजमिनी होत्या. जलयुक्त शिवार योजनेत भातशेती पाणी धरून ठेवण्यासाठी आणि पाणी जमिनीत मुरवण्यासाठी ती महत्त्वाची मानली गेली. या भातशेतीत आता भराव घालून समृद्धी आणि मुंबई–वडोदरा महामार्गाचे रस्ते बांधले जात आहेत. हा भराव अनेक ठिकाणी तो दहा फुटांपासून ३० फुटांपर्यंत गेला आहे. या शेतजमिनीवर साचणारे पाणी आता रस्त्यावर जाऊन साचते आहे. त्याचा फटका वाहतुकीला बसतो आहे. गेल्या वर्षात शहापूर तालुक्यातील महाळुंगे या कोयना धरणग्रस्तांच्या गावातील विहिरीत 'समृद्धी'च्या कामामुळे सांडपाणी शिरल्याच्या तक्रारी आल्या. समृद्धीच्या वाटेवरील गावागावांमधून अशा तक्रारी आता पुढे येत आहेत. नैसर्गिक प्रवाह अडल्याने पावसाचे पाणी मुख्य रस्त्यांवर येऊ लागले आहे.

# तु. बा. कदम महाविद्यालयाची युवा महोत्सवामध्ये चमकदार कामगिरी महाविद्यालयाचे "बहु संथाळ" हे पारंपारिक लोकनृत्य ठरले प्रथम क्रमांकाचे मानकरी



तु. बा. कदम महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी कायमच प्रयत्न करत असते. त्यामुळेच महाविद्यालय विविध क्षेत्रात आपला अलौकिक ठसा उमटवित आहे. युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या यशामध्ये मानाचा तुरा खोवला आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या ५७ व्या युवा महोत्सवाची प्राथमिक फेरी (झोनल राऊंड) आय. सी. एस. महाविद्यालय, खेड येथे संपन्न झाली. या महोत्सवामध्ये उत्तर रत्नागिरीतील २२ महाविद्यालयांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, नृत्य, गायन, वादन, अभिनय अशा विविध ४२ कला प्रकारांचे सहभाग घेतलेला होता. मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या युवा महोत्सवातील प्राथमिक फेरीमध्ये महाविद्यालयाने चमकदार कामगिरी पार पाडलेली आहे. युवा महोत्सवामध्ये 'पारंपारिक लोककला' प्रकाराला महत्त्वपूर्ण स्थान आहे. या नृत्य प्रकारात पारितोषिक मिळविण्यासाठी अनेक महाविद्यालये अतोनात प्रयत्न करत असतात. या कला प्रकारात पारितोषिक मिळणे म्हणजे युवा महोत्सवात मोठे यश संपादन केले असे सर्वसाधारणपणे समजले जाते. याच लोकनृत्य कला प्रकारात "बहु संथाळ" या पारंपारिक लोककला नृत्याने प्रथम क्रमांक मिळविल्याने मुंबई विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाचे व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे. तसेच मेहंदी या कला प्रकारात द्वितीय क्रमांक व कथा कथन प्रकारात तृतीय क्रमांक विद्यार्थ्यांनी मिळविला आहे. अंतिम फेरी २८ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत मुंबई विद्यापीठात होणार आहे.

या प्रसंगी कुणबी शिक्षण प्रसारक संस्था, खेड – मुंबईचे अध्यक्ष मा. भि. म. गोवळकर साहेब, सचिव मा. ॲड. तु. ल. डफळे साहेब, सह–साचिव मा. द. भि. धुमक साहेब, खजिनदार मा. राजाभाऊ बैकर साहेब, संस्था सदस्य मा. दत्ताशेठ बैकर साहेब, मा. बाबाराम तळेकर साहेब तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व्हि. एन. साळुंखे सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील पुढील फेरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. नवयुग सकपाळ, प्रा. यु. एम. वरवाटकर, प्रा, एन. एस. कांबळे, प्रा. आय. एस. कदम, प्रा. सुनील सोनकर, प्रा. सुर्वे, प्रा. शितल माळी, व प्रा. एस. एस. दळवी यांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी परिश्रम घेतले व श्री. योगेश मोहिते यांचे लोकनृत्य दिग्दर्शनासाठी विशेष मार्गदर्शन केले.

# रायगडकरांच्या तक्रारीचे निवारण करणाऱ्या न्यायाधीश व वकिलांवर न्याय मागण्याची दुर्दैवी वेळ

**रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाची इमारत बनली धोकादायक**
**कामकाजच्या वेळेत वारंवार कोसळतोय स्लॅब**
**जुनी, जर्जर धोकादायक इमारत कोसळून मोठी जीवित हानी होण्याची भीती**
**इमारतीचे नूतनिकरण करण्याची मागणी**

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत ) रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या इमारतीची मोठ्या प्रमाणावर पडझड व दुरावस्था झालीय. इमारतीला चहूबाजूनी गळती लागली आहे. तर महत्त्वाच्या असलेल्या न्यायाधिशांची खोली तसेच इतर दस्त ऐवज ठेवण्याच्या खोल्याची अत्यन्त दयनीय अवस्था झालीय. त्यामुळे रायगडकरांच्या तक्रारीचे निवारण करणाऱ्या न्यायाधीश आणि वकिलांवर न्याय मागण्याची दुर्दैवी वेळ आलीय. येथील इमारत अखेरची घटका मोजत असून शासनाने या इमारतीच्या दुरावस्थेचा आढावा घेऊन इमारतीच्या नूतनीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी महत्त्वपूर्ण मागणी येथील वकील वर्गाकडून करण्यात येत आहे.इमारत जर्जर आणि धोकादायक स्थितीत असून येथील स्लॅब सतत कोसळत असल्याने न्यायाधीश वकील आणि कर्मचारी जीव मुठीत घेऊन दिवस ढकलत आहेत. तसेच इथं कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसल्याने वकिलांकडून तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त केला जात आहे.ङ्गउच्च न्यायालयाचे वकील शाम कोंढाळकर यांनी सांगितले की आमची इमारत धोकादायक बनली आहे. तक्रार निवारण करण्यासाठी जिल्ह्यातील विविध भागातून पक्षकार येतात, मात्र इथं इमारत मोडकळीस आली आहे. भिंतीना बुरशी लागल्याने आजार बळावण्याची भीती आहे. आमच्यासह इथे येणाऱ्या पक्षकारांचा जीव धोक्यात आला आहे. येथे कोणत्याही सुविधा नाहीत, अनेक समस्यानी वेढा घातला आहे. शासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जाते. सदरची इमारत दुरुस्त करावी आणि चांगल ग्राहक न्यायालय निर्माण करावे अशी मागणी केली.



तर वकील राजकुमार जगताप म्हणाले की या इमारतीत न्याय दानाचे काम होते. मात्र या इमारतीत कोणत्याही सोई सुविधा नाहीत. इथं स्वच्छतागृह नाही, गळती आहे, सतत स्लॅब कोसळत आहे. असह्य दुर्गंधी आहे.आम्ही रायगड जिल्हाधिकारी, आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सतत ही दुरावस्था निर्दशनास आणली पण कुणीही लक्ष देत नाही, सदरची इमारत कोसळून दुर्घटना झाली तर जबाबदार कोण असा सवाल जगताप यांनी विचारला. महत्वाचे दस्त ऐवज कागदपत्रे ठेवलेल्या खोल्या मध्ये गळती लागल्याने कागदपत्रे खराब होण्याची परिस्थिती दिसून येतेय. तर सर्वच खोल्यातील भिंतीवर असलेल्या विद्युत बोर्ड ला पाणी लागत असल्याने विजेचा धक्का लागण्याची भीती व्यक्त केली जातं आहे. भिंतीला बुरशी चढल्याने दुर्गंधी पसरून कार्यालयीन स्टाप तसेच जिल्ह्यातून तक्रारी घेऊन आलेले नागरिक यांचा जीव घुसमटत आहे. अशा धोकादायक इमारतीत बसून आम्ही काम कसे करणार? या धोकादायक इमारतीत प्रवेश केल्यापासून वकिलांच्या शिरावर मृत्युची टांगती तलवार दिसून येते. इमारत कोसळून जीवघेणी दुर्घटना होण्याची वेळ आली असताना याकडे शासनाकडून दुर्लक्ष केले जातं आहे. जिल्ह्यातील अन्य कार्यालय यांचे जलद नूतनिकरण सु शोभीकरण होत असताना केवळ ग्राहक तक्रार आयोगाकडून शासनाला कर मिळत नसल्यानेच इमारतीकडे दुर्लक्ष केले जातं असल्याचा आरोप वकिलांनी केलाय.

# बेकायदा फेरीवाल्यांचा गंभीर मुद्दा चेष्टेचा विषय, सरकार–महापालिकेतील आरोपप्रत्यारोपावरून उच्च न्यायालयाचे खडेबोल

मुंबई: मुंबई आणि उपनगरातील सार्वजनिक रस्ते आणि पदपथांवरील वाढत्या बेकायदा फेरीवाल्यांच्या समस्येवर ठोस तोडगा काढण्याऐवजी त्यांवर कारवाई कोणी करायची? यावरून राज्य सरकार आणि महानगरपालिकेकडून एकमेकांवर आरोपप्रत्यारोप केले जात आहेत. दोन्ही यंत्रणांच्या या वर्तनामुळे बेकायदा फेरीवाल्यांचा गंभीर मुद्दा चेष्टा– मस्करीचा विषय झाला असल्याचे खडेबोल उच्च न्यायालयाने गुरुवारी सुनावले.

बेकायदा फेरीवाल्यांच्या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी फेरीवाला पदपथ फेरावाला कायदा २०१४ मध्ये लागू करण्यात आला. त्यानुसार, फेरीवाला समन्वय समिती (टीव्हीसी) स्थापन करणे, फेरीवाल्यांना परवाने देणे अनिवार्य आहे. परवानाधारक आणि बेकायदा फेरीवाल्यांची ओळख पटव्याच्यादृष्टीनेही हा कायदा महत्त्वपूर्ण आहे. परंतु, कायदा करून दहा वर्षे उलटली तरी फेरीवाला समन्वय समितीची स्थापना करण्यात आलेली नाही. त्याऐवजी, राज्य सरकार आणि महापालिका प्रशासन एकमेकांवर आरोपप्रत्यारोप करून जबाबदारी झटकत असल्याचे न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने सुनावले. तसेच, पदपथ, सार्वजनिक रस्त्यांच्या दुतर्फा ठाण मांडणाऱ्या बेकायदा फेरीवाल्यांमुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत असून फेरीवाला कायद्याची अंमलबजावणी सरकार आणि महापालिकेकडून केली जात नाही हे दुर्दैवी आणि क्लेशकारक असल्याचा संताप न्यायालयाने व्यक्त केला. कायद्याची अंमलबजावणी आणि न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचेही पालन केले जात नसल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. अद्यापही टीव्हीसीची स्थापना का झाली नाही ? महापालिका प्रशासन सहकार्य करत नसल्याचे सरकारकडून सांगितले जाते, तर महापालिका अन्य कोणाकडे तरी अंगुलिनिर्देश करते. कारवाईच्या मुद्यावरून यंत्रणांमध्ये एवढी हतबलता का? एकत्र येऊन समस्येवर तोडगा का काढला जात नाही? बेकायदा फेरीवाल्यांमुळे सगळ्यांनाच त्रास होत आहे. हे आणखी किती दिवस चालणार ?



टीव्हीसी योजना लागू न करता तुम्ही सर्वसामान्यांचा त्रास कसा कमी करणार आहात ? अशी प्रश्नांची सरबत्ती न्यायमूर्ती सोनक यांनी सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे केली. घोड्याला ओढ्यापर्यंत नेऊ शकतो पण घोड्याला पाणी स्वत:च प्यावे लागेल, असे सुनावताना या समस्येवर काही व्यवहारिक उपाय शोधावा असेही न्यायालयाने म्हटले.

अधिकाऱ्यांची निष्क्रियता जबाबदार

आपल्याकडे कायदे केले जातात परंतु त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत सर्वसामान्यांनी हा त्रास सहन करत राहायचा का? असा प्रश्न न्यायालयाने विचारला. तसेच, अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळेच लोकांना त्रास सहन करावा लागतो आहे. कायद्याची अंमलबजावणी योग्य वेळी झाली असती तर ही वेळ आलीच नसती, असेही न्यायालयाने सरकार आणि महापालिकेला सुनावले.

सप्टेंबरअखेरीपर्यंत टीव्हीसी स्थापन करा, अन्यथा

सरकार आणि महापालिका प्रशासनाने एकमेकांना दोष न देता ३० सप्टेंबरपर्यंत टीव्हीसीची स्थापना करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिवांवर असेल. विधिमंडळाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करणे हे सरकारचे कर्तव्य आहे, असे सुनावताना कोणत्याही परिस्थितीत योजना तयार करण्यास विलंब होता कामा नये, असा इशाराही न्यायालयाने दिला.

# मनोरमा खेडकर यांना जामीन मंजूर, मुळशी तालुक्यात जाण्यास न्यायालयाची मनाई

पुणे : भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) उमेदवारी रद्द केलेली प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांची आई मनोरमा यांचा जामीन अर्ज न्यायालयाने शुक्रवारी मंजूर केला. मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांना पिस्तुलाचा धाक दाखविल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या खेडकर या येरवडा कारागृहात असून, त्यांना मुळशी तालुक्यात जायचे नाही, या अटीवर जामीन मंजूर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.



मुळशीतील शेतकऱ्यांना पिस्तुलाचा धाक दाखवून जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी मनोरमा खेडकर, त्यांचे पती दिलीप खेडकर (दोघे रा. नॅशनल हाऊसिंग सोसायटी, बाणेर), अंबादास खेडकर (रा. आंबी, ता. हवेली) यांच्यासह अंगरक्षकांविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत शेतकरी पांडुरंग पासलकर (वय ६५) यांनी फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर मनोरमा खेडकर या पसार झाल्या होत्या. ग्रामीण पोलिसांच्या पथकाने त्यांना महाड परिसरातून अटक केली. त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. पोलीस कोठडी संपल्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्यानंतर त्यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली. दिलीप खेडकर यांना नुकताच जामीन मंजूर झाला आहे. त्यानंतर मनोरमा यांचाही जामीन अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. मनोरमा खेडकर यांनी वकील ॲड. सुधीर शहा यांच्यामार्फत न्यायालयात जामीन मिळवण्यासाठी अर्ज केला. प्रत्यक्ष गोळीबार झालेला नाही. त्यामुळे खुनाच्या प्रयत्नाचे कलम लागू होत नाही. त्यांच्याकडे पिस्तुलाचा परवाना असून, त्यांनी स्वरक्षणासाठी पिस्तूल वापरले आहे, असा युक्तिवाद ॲड. सुधीर शहा यांनी केला. सरकारी पक्षातर्फे ॲड. कुंडलिक चौरे आणि फिर्यादी पासलकर यांच्या वतीने ॲड. अमेय बलकवडे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मनोरमा खेडकर यांच्यासह अंबादास खेडकर यांचा काही अटींवर जामीन मंजूर केला.

दरम्यान, दिल्लीतील न्यायालयाने पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) पूजाविरुद्ध दिल्लीत गुन्हा दाखल केला आहे. तसेच तिची उमेदवारी रद्द केली आहे.

# देशातील इथेनॉल उत्पादनक्षमता १५८९ कोटी लिटरवर

पुणे : देशाची वार्षिक इथेनॉल उत्पादनक्षमता १५८९ कोटी लिटरवर गेली आहे. त्यात प्रामुख्याने ऊस, मका, खाण्यायोग्य नसलेले तांदूळ, गहू, विविध प्रकारचा टाकाऊ कचरा आणि गवतासह अन्य कृषी कचऱ्यापासून इथेनॉलनिर्मिती प्रकल्पांचा समावेश आहे.

केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न तथा सार्वजनिक वितरण आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'देशाची इथेनॉल उत्पादनक्षमता १,५८९ कोटी लिटरपर्यंत वाढली आहे. त्यामुळे देशांतर्गत इथेनॉलची गरज सहजपणे भागवू शकतो. एकूण इथेनॉल उत्पादनात साखर कारखान्यांमध्ये उत्पादित झालेल्या इथेनॉलचा वाटा आजवर सर्वाधिक होता.

आता अन्नधान्यापासून उत्पादित इथेनॉलचे प्रमाण वाढले आहे. मक्यापासून इथेनॉलनिर्मितीने गती घेतली आहे.'जून २०२४ मध्ये पेट्रोलमध्ये इथेनॉलची मिश्रण पातळी १५.९० टक्क्यांवर गेली आहे. नोव्हेंबर २०२३ जून २०२४ दरम्यान एकत्रित इथेनॉल मिश्रण पातळी

१३ टक्क्यांवर गेली आहे. २०२५ पर्यंत २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. हे साध्य करण्यासाठी अंदाजे १०१६ कोटी लिटर इथेनॉल आवश्यक आहे, त्यासह अन्य वापरासाठी मिळून एकूण इथेनॉलची गरज १३५० कोटी लिटर आहे. इथेनॉल प्रकल्प आपल्या उत्पादन क्षमतेच्या सरासरी ८० टक्के क्षमतेने इथेनॉलनिर्मिती करीत असल्यामुळे २०२५ पर्यंत सुमारे १७०० कोटी लिटर इथेनॉल उत्पादनक्षमता आवश्यक आहे.

दरम्यान,

डिसेंबर २०२३ मध्ये देशाची इथेनॉलनिर्मितीची क्षमता १३८० कोटी लिटर इतकी होती.

त्यापैकी उसापासून ८७५ कोटी लिटर आणि धान्यापासून ५०५ कोटी लिटर क्षमता होती.

# नागरिकांना फटका

एक दिवस पडलेल्या मुसळधार पावसाने, खडकवासला धरणातून सोडल्या गेलेल्या जादा पाण्याने पुण्यातल्या नागरिकांची उडालेली दैना हे आपल्या तथाकथित विकासाचे, स्मार्ट शहरांच्या स्वप्नाचे अत्यंत भकास आणि विद्रूप रूप आहे. गावांच्या तुलनेत शहरे विकसित, रोजगार देणारी, चांगले जीवनमान देणारी मानली जातात. ती कुठला ना कुठला रोजगार देतात हे खरेच. पण एरवीच्या बकाली, प्रदूषण या प्रश्नांच्या जोडीला आता पावसाचे पाणी थेट घराच्या दारातच आणून सोडू लागली आहेत. पुण्यात आनंदनगरमधल्या निंबजनगरसारख्या भर शहरात असलेल्या वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांना होडीतून बाहेर आणावे लागणे हे दृश्य त्यामुळे विदारकच होते. काल ते पुण्यात होते, त्याआधी कधी मुंबईत, कधी ठाण्यात, कधी कोल्हापुरात, कधी चिपळूणमध्ये एवढेच नाही तर चेन्नई, बेंगळूरु, कोलकाता, श्रीनगर अशा कोणत्याही शहरात या ना त्या पावसाळ्यात कोणत्या ना कोणत्या भागात अशीच परिस्थिती असते. एखादा मोठा पाऊस होऊन गेल्यानंतर रस्त्यांवरून नदीसारखे वाटावे अशा पद्धतीने वाहणारे पाणी, कुठे कुठे जीव मुठीत घेऊन थांबलेली माणसे आणि पाण्यातून वाहून जाणाऱ्या दुचाक्याच नाही तर चारचाक्याही. या दुरवस्थेतून आता कुठलीही शहरे सुटलेली नाहीत. पाणीटंचाई झेलत उन्हाळ्याचे चार महिने काढल्यानंतर आलेला पाऊस असा जीवघेणा ठरतो हे विकासाच्या कोणत्या स्वप्नात बसते हा प्रश्न तिथल्या रहिवाशांना पडत असेलच, पण तो विचारणार कुणाला? पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची, हे अद्यापही कुणाला माहीत नाही. कारण पावसाने एखाद्या शहराला झोडपले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा नागरिकांना फटका बसू नये ही तळपासून वरपर्यंत कोणत्याच राजकारण्यांना, प्रशासकांना त्यांची जबाबदारी कुठे वाटते? राजकारण्यांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे फक्त निवडणुकीच्या काळात मते देणारे मतदाते. प्रशासकांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे दरमहा त्यांचे पगार, भत्ते यांची सोय करणारे करदाते. यापलीकडे नागरिकांच्या जगण्यामरण्याशी त्यांना काहीच देणेघेणे नाही. आज ते पुरात मरतील, उद्या पाण्याअभावी, परवा एखाद्या आगीत काय फरक पडतो? राज्यकर्त्यांना रामराज्य आणायचे असेल तर नागरिकांना रामभरोसे जगावेच लागते, याचे यापेक्षा आणखी उदाहरण काय पाहिजे?

नगरनियोजनाची ऐशीतैशी म्हणजे आपली सगळी शहरे आणि निमशहरे. शहरे म्हणजे खरे तर मोठी खेडीच. घरे, रस्ते, वीज, पाणी यांच्या बाबतीत त्यांची लोकसंख्या सामावून घेण्याची क्षमता किती आहे, याचा विचारही न होता, ती फुगत चालली आहेत. त्यामुळे मागणी तसा पुरवठा या न्यायाने घरे उपलब्ध करून देणे आले. एखाद्या शहराच्या बाहेरील परिसर महापालिकेत समाविष्ट होण्याची कुणकुण लागली की तिथे गवत उगवावे तशा इमारती उभ्या राहतात. बांधकामांच्या सगळ्या नियमांचे उल्लंघन हीच जणू त्यांची पूर्वअट असते. साहजिकच तिथली घरे तुलनेत स्वस्तात उपलब्ध असतात. त्यामुळे मग ती विकत घेतली जातात. कालपरवा पाण्याखाली गेलेले पुण्यातील निंबजनगर हे गेल्या ३०-४० वर्षांमध्ये अशाच पद्धतीने मुठा नदीच्या अगदी पात्रालगत उभे राहिले आहे. अगदी खेटून असलेल्या इमारती, निकृष्ट बांधकाम हे सगळे करून त्यात पैसे कमावणारे सगळेच जण बाजूला झाले आहेत आणि तिथल्या रोजच्या प्रश्नांशी झगडतो आहे तो तिथे राहणारा सामान्य माणूस. नगररचनेशी, नगरनियोजनाशी देणेघेणे नसलेल्या राज्यकर्ते आणि प्रशासकांच्या अभद्र युतीमुळे तो जगण्यातल्या समस्यांमध्ये किती खोलवर बुडाला आहे, हे त्याला प्रत्यक्षात बुडवायला येणाऱ्या पाण्याला कसे समजणार?

त्यामुळेच २६ जुलै २००५ च्या ढगफुटीत मिठी ही नदी आहे, नाला नाही, हा साक्षात्कार मुंबईकरांना झाला तसाच मुठा ही नदी आहे, घरे बांधण्याची, वाहनांच्या पार्किंगची, रस्त्यांची जागा नाही, हा दरवर्षीच्या पावसाळ्यात पुणेकरांना नव्याने होतो आणि पावसाळा संपला की पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. फक्त पुण्यात वा मुंबईतच नाही, तर सगळ्या शहरांमध्ये थोड्याफार फरकाने हेच सुरू आहे. नगरनियोजन हा आपला विषय नाही, अशीही राज्यकर्त्यांची समजूत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखाद्या मोठ्या रुग्णालयाला लागून एखादा भव्यदिव्य मॉल उभा राहू शकतो आणि तिथल्या मल्टिप्लेक्समध्ये सिनेमा पाहायला जाणारा सिनेरसिक आणि हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ॲम्ब्युलन्समधून रुग्णालयात जाऊ पाहणारा रुग्ण असे दोघेही एकाच वेळी वाहतूक कोंडीमध्ये अडकतात.

अति पावसामुळे निर्माण झालेल्या समस्यांबद्दल बोलावे तर घरे, बांधकामे, पाणी तुंबवणारा प्लास्टिकचा कचरा, रस्ते, वाहतूक कोंडी हे सगळे मुद्दे आपोआपच आले. या काळात निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न, बंद ठेवाव्या लागणाऱ्या शाळा, पाणी शिरून होणारे वाहनांचे नुकसान, पावसात पडणाऱ्या पाण्याचे नीट व्यवस्थापन यांचा तर उल्लेखही करता आलेला नाही. अंडाभुर्जीची गाडी चालवणारे तीन सामान्य जीव विजेचा शॉक लागून गेले, अशांची 'पावसाळी दुर्घटने'त मोजदाद तरी होते का? विकासाच्या स्वप्नांमध्ये या असल्या 'फालतू' गोष्टी झाकून ठेवल्या जातात आणि तिथे येतात मोठमोठे टॉवर्स, मोठमोठे महामार्ग. वेगवेगळ्या शहरांमध्ये अशा टॉवर्सच्या आसपासच्या परिसरातील वस्त्यांमध्ये याआधी पावसाचे पाणी साठत नव्हते आणि यंदाच ते साठू लागले, अशा तक्रारी येऊ लागल्या आहेत. अशाच तक्रारी समृद्धी महामार्गाच्या परिसरातील काही गावांनी केल्या आहेत, अशा बातम्याही यंदा आल्या आहेत. आपल्याला स्मार्ट सिटी हव्या आहेत, त्यात मेट्रो हव्या

# पाली खोपोली राज्य महामार्गावर मोठे होर्डिंग कोसळले : सुदैवाने घाटकोपर घटनेची पुनरावृत्ती टळली : सर्व अनधिकृत होर्डिंगवर कारवाई न झाल्यास मनसे छेडणार तीव्र आंदोलन

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत ) पाली खोपोली राज्य महामार्गावर उंबरे गावाजवळ शनिवारी (ता. ३) एक मोठे होर्डिंग कोसळले असून त्याचा काही भाग रस्त्यावर आला आहे. सुदैवाने यावेळी कोणते वाहन व पादचारी तिथून जात नसल्यामुळे दुर्घटना घडली नाही. या मार्गावरील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई न



झाल्यास मनसे तीव्र आंदोलन छेडल असा इशारा मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे यांनी या घटनेनंतर प्रशासनाला दिला आहे.

हे लोखंडी अवजड होर्डिंग पडतांना येथून एखादे वाहन किंवा पदाचारी जात असते तर घाटकोपर येथील दुर्घटनेची पुनरावृत्ती झाली असती, असे सुनील साठे म्हणाले.

तसेच हे होर्डिंग लावण्यासाठी संबंधित जाहिरातदाराने एमएसआरडीसीची परवानगी घेतली आहे की नाही याची चौकशी करण्यात यावी. आणि अशा स्वरूपाचे जेवढे होर्डिंग असतील त्यांची चौकशी करावी व ते अनधिकृत असल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अन्यथा मनसे तर्फे सर्वात मोठे आंदोलन केले जाईल. असा इशारा सुनील साठे यांनी दिला.

# अधिक किंमतीत रक्त विकणाऱ्या पेढ्यांवर कारवाई, १ कोटी रुपयांची दंड वसुली, हिंदूजा रुग्णालयाचा दोन वर्षांचा दंड थकीत

मुंबई : रक्तपेढ्यांनी अतिरिक्त किंमतीत रक्त विकल्याप्रकरणी रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) १ कोटी ३२ लाख ९२ हजार रुपये दंडापोटी वसूल केले आहेत. मुंबईतील २१ खासगी रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यात आली आहे. मात्र एका खासगी रुग्णालयाने दोन वर्षे उलटली तरी दंडाची रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे.

रुग्णांना अल्पदरात रक्त उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्य सरकारच्या राज्य रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) रक्ताचे शुल्क निर्धारित केले होते. मात्र खासगी रुग्णालयाकडून त्याचे उल्लंघन होत असल्याने राज्य सरकारने २०१८ मध्ये अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या रक्तपेढ्यांवर चार पट दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यापूर्वी या नियमाचे उल्लंघन केलेल्या रक्तपेढ्यांचा दंडही थकला असल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे.

एसबीटीसीने २०१४ ते २०१८ या कालावधीत अतिरिक्त किंमतीत रक्त देणाऱ्या २१ रक्तपेढ्यांकडून दंडापोटी १ कोटी ३२ लाख ९२ हजार वसूल केले. त्यात सर्वाधिक दंड हा हिंदुजा रुग्णालयाकडून ३३ लाख ३० हजार रुपये इतका दंड वसूल केला आहे. त्याखालोखाल जसलोक रुग्णालयाकडून १७ लाख ३७ हजार रुपये, कोकीलाबेन रुग्णालय १४ लाख ७२ हजार रुपये, मुंबई रुग्णालय १२ लाख ६२ हजार रुपये, फोर्टीस रुग्णालय ९ लाख ३४ हजार रुपये इतके दंड वसूल करण्यात आले आहेत. मात्र हिंदुजा रुग्णालयाच्या एकूण दंडाच्या रकमेपैकी त्यांनी फक्त ३३ लाख भरले असून उर्वरित १५ लाख ७३ हजार ९३५ रुपयांचा दंड दोन वर्षांपासून भरलेला नाही.

हा दंड भरण्यासाठी एसबीटीसीकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत असूनही त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे.

एसबीटीसीने आकारलेल्या दंडामध्ये थॅलेसेमिया सारख्या रुग्णांना मोफत रक्त दिलेल्या रक्ताचा तसेच लेखा परीक्षकांनीही काही दंड पुन्हा आकारला असल्याचा दावा हिंदुजा रुग्णालयाने केला होता. मात्र एसबीटीसीने झालेली चूक सुधारल्यानंतर सुधारित दंडापैकी १५ लाख रुपये रुग्णालयाने भरले नसल्याचे माहिती अधिकारात मिळालेल्या उत्तरातून दिसते आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी ही माहिती मागितली होती.

आकारलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेवर २० टक्क्यांपेक्षा अधिक दंड आकारणे अपेक्षित होते. हिंदुजा आणि एसबीटीसी यांच्यातील हे प्रकरण मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे आता एसबीटीसीने या दंडाच्या रकमेवर व्याज आकारून त्याची वसूली करावी, असे कोठारी यांनी सांगितले.

हिंदुजा रुग्णालयाचे म्हणणे काय?

पी.डी. हिंदुजा रुग्णालय हे दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी ओळखले जाते. उच्च दर्जाची आरोग्य सेवा पुरवण्यावर रुग्णालयातर्फे नेहमीच भर दिला जातो. त्यासाठी सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे आणि शिफारशींचे संबंधित अधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे पालन केले जाते. त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सर्व नियमांचे नेहमीच पालन केले असून, त्यांना सहकार्य केले आहे. रुग्णालयाच्या सहकाऱ्याबद्दल परिषदेकडून नेहमीच समाधान व्यक्त केले जात असल्याचे हिंदुजा रुग्णालयाच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
रविवार ०४ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# अखेर रमेश कदम यांचे आमरण उपोषण व जलसमाधी आंदोलन तुतार्स स्थगित..

कर्जत ( जयेश जाधव ) श्री रमेश कदम पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत संघटना हे जलसंपदा पाटबंधारे विभाग कर्जत यांच्या भोंगळ कारभार मुळे उल्हास, पातळगंगा, चिल्लर व इतर नद्या कळव्यातील मधील अतिक्रमणांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी मागणी करिता याकरिता तसेच खांडपे ग्रामपंचायत ग्रामसेवक यांच्या मनमानी कारभाराची चौकशी व्हावी. या मागण्यासाठी टिळक चौक कर्जत येथे दिनांक २९/०७/२०२४ रोजी १२.१० वा पासून ठिय्या आंदोलन करिता बसले होते. परंतु ठिय्या या आंदोलना दरम्यान मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी दिनाक ०१/०८/२०२४ रोजी पासून आमरण उपोषण सुरु केले होते.



दरम्यान उपोषण कर्ते व पाटबंधारे विभाग कर्जत तसेच स्थानिक प्रशासन यांच्यात आज दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सायंकाळी ७.०० वाजता सकारात्मक चर्चा झाल्याने सदर बाबत ९० दिवसाच्या आत कारवाई बाबतचे लेखी आश्वासन दिल्याने सदरचे आमरण उपोषण व जलसमाधी आंदोलन हे स्थगित करण्यात आले आहे. यावेळी मा. तहसीलदार कर्जत, पाटबंधारे विभाग मा उपविभागीय अभियंता हे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते व पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली राष्ट्रीय अध्यक्ष संतोष चौधरी, सुनील पाटील पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यांच्यासह ७ ते ८ जनसमुदाय उपस्थित होता.या ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता.

# युवा महोत्सवात जे. एस. एम. चा जल्लोष : रायगड (दक्षिण) विभागात पटकावली सर्वाधिक पारितोषिके

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास कक्षातर्फे डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय, कोलाड येथे गुरुवार, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित युवा महोत्सवाच्या रायगड (दक्षिण) जिल्हास्तरीय फेरीत एकूण १९ स्पर्धांमध्ये यश संपादन करून जे. एस. एम. महाविद्यालयाने रायगड (दक्षिण) विभागात सर्वाधिक पारितोषिके पटकावण्याचा सन्मान प्राप्त केला.ङ्गयुवा महोत्सवात अलिबाग, पेण, महाड, माणगाव, रोहा, मुरुड, तळा, श्रीवर्धन, म्हसळा, पोलादपूर, सुधागड या तालुक्यांतील २५ महाविद्यालयांतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी संगीत, नाट्य, नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन, मेहेंदी, मूर्तीकला, कोलाज, कार्टूनिंग, चित्रकला, रांगोळी अशा विविध प्रकारच्या ३२ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.



जे. एस. एम. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकूण २८ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. त्यापैकी वक्तृत्व (मराठी), कथाकथन (मराठी), स्कीट (मराठी), चित्रकला, माइम (मूकनाट्य) या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक, लोकनृत्य, समूहगीतगायन, एकपात्री अभिनय (हिंदी), शास्त्रीय वाद्यवादन, शास्त्रीय गायन, रांगोळी, मूर्तीकला, सुगम संगीत गायन या स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक; तर कथाकथन (हिंदी), वक्तृत्व (इंग्रजी), नाट्यसंगीत या स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक आणि वादविवाद, कोलाज, शास्त्रीय नृत्य या स्पर्धांमध्ये उत्तेजनार्थ अशी एकूण १९ स्पर्धाप्रकारांमध्ये पारितोषिकांची लयलूट करत जे. एस. एम. महाविद्यालयाने रायगड (दक्षिण) विभागात आपला दबदबा कायम राखला. कु. श्रेया अधिकारी हिने सहा स्पर्धांमध्ये सहभाग घेत चार स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त केली.ङ्गविद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. ॲड. गौतम पाटील, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख प्रा. श्वेता पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व मुंबई विद्यापीठस्तरीय अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण ३५ डद्योजक, १ हजार उमेदवारांची महास्वयंम वर नोंदणी : १३ उद्योजक, शासकीय आस्थापनात १०८ उमेदवार रुजू

*रत्नागिरी, (जिमाका) : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत अवघ्या १५ दिवसात जिल्ह्यातील जवळपास ३५ उद्योजक व १ हजार उमेदवार यांनी महास्वयंम पोर्टलवर नोंदणी केली आहे.*

*त्यापैकी १३ उद्योजक/ शासकीय आस्थापना यांच्याकडे १०८ उमेदवार रुजू करुन घेण्यात आलेले आहेत. महसूल पंधरवडानिमित्त पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांच्या उपस्थितीत या उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त इनुजा शेख यांनी दिली.ङ्ग ब्राम्हण हितवर्धिनी ग्रामीण बिगर शेती सहकारी दापोली येथे ६ प्रशिक्षणार्थी,*

*गद्रे मरीन एक्सपोर्ट प्रा. लि., एमआयडीसी मिरजोळे येथे २२ प्रशिक्षणार्थी, लक्ष्मी कश्यु एमआयडीसी मिरजोळे येथे १६ प्रशिक्षणार्थी, श्री गोपाळकृष्ण ग्रामीण बिगर शेती सहकारी मर्यादित, दापोली येथे १, सुर्वे ग्रुप लोटे परशुराम चिपळूण येथे २१ प्रशिक्षणार्थी, स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी मध्ये ५, राजापूर को–ऑपरेटीव्ह बँक लि, राजापूर येथे १७, झिलानी मरीन मिरजोळे येथे ५, राजापूर तालुका कुणबी सहकारी संस्था मर्या, राजापूर येथे ३, जिल्हा परिषदमध्ये ९, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामद्योग मंडळ आणि नगर रचना आणि मुल्य निर्धारण विभाग प्रादेशिक योजना येथे प्रत्येकी १ असे एकूण १०८ प्रशिक्षणार्थी रुजू झाले आहेत.ङ्ग या योजनेचा लाभ जास्तीत जास्त उद्योजक व उमेदवारांनी घ्यावा, असे आवाहन श्रीमती शेख यांनी केले आहे.*

# गोखले महाविद्यालयाचे युथ फेस्टिवल मध्ये यश



बोर्लीपंचतन - २ ऑगस्ट २०२४. ( केतन माळवदे ) श्रीवर्धन तालुक्यातील आराठी येथील, विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई, आयोजित, कोलाड येथे संपन्न, ५७ व्या युवा महोत्सवामध्ये ( रायगड दक्षिण झोन) गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या एकूण १४ विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला व त्यासाठी मोठे परिश्रम घेतले. प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख, डॉ. कल्याणी नाझरे तसेच सांस्कृतिक विभाग सदस्य यांनी विशेष मार्गदर्शन केले. स्पर्धेत यशप्राप्त विद्यार्थी ङ्गकु. आर्यन भगत- कार्टूनिंग -उत्तेजनार्थ, कू. पूर्वा नाझरे आणि कु. सोनिया सावंत - मराठी वादविवाद - तृतीय, कु. शिवम वाणी - मराठी कथा कथन - उत्तेजनार्थ आणि कु. सोनिया सावंत - मराठी वक्तृत्व - द्वितीय. या विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन करून महाविदयालयाच्या नावलौकिकात भर टाकली. त्यांचे, गोखले शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व महाविद्यालय विकास समिती सदस्य, प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी, उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे सर, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी-पालक, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल म्हसळ्याच्या विद्यार्थ्यांनी घेतले मतदानाचे धडे वर्ग मंत्रिमंडळ यांनी लोकशाही पद्धतीने केले मतदान

## कु.सलोनी जैयस्वाल व कु.अनुराग येलवे हे विद्यार्थी चांगल्या मताधिक्यांनी विजयी

*द. रा. जि. प्रतिनिधी :*
*संतोष उध्दरकर.*

*म्हसळा: दि. ३ ऑगस्ट रोजी न्यू इंग्लिश स्कुल म्हसळा या शाळेत आनंददायी शनिवार उपक्रम अंतर्गत शालेय विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक हा उपक्रम राबविण्यात आले होते त्यासाठी ४ विद्यार्थिनी प्रतिनिधी व ६ विद्यार्थी प्रतिनिधी उमेदवारीसाठी उभे होते आणि विद्यार्थी प्रतिनिधी उमेदवारांनी प्रत्येक वर्गात जाऊन आपला प्रचार केला.*

*मतदान प्रक्रिया उत्तम पणे पार पाडण्यासाठी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी उमेदवार यांचे चिन्ह वाटप करण्यासाठी निवडणूक अधिकारी म्हणून गर्जे एन.एम व मोरे एच.बी यांनी केले ,मतदानासाठी मतदार यादी बनविण्याचे काम खोकले एम.सी यांनी केले असून मतदान क्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून कु.सिद्धी मोहिते,मतदान अधिकारी अनुक्रमे कु. श्रेयश कोठावळे ,कु.आर्यन कांबळे कु. हितेश कांबळे व कु.आदित्य गव्हाणे यांनी काम पाहिले आणि या मतदान प्रक्रिया साठी सर्व वर्गातील मंत्रिमंडळ यांनी लोकशाही पद्धतीने मतदान करून विद्यार्थी प्रतिनिधी निवडले यामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी मधून कु.अनुराग येलवे व विद्यार्थिनी प्रतिनिधीसाठी कु.सलोनी जयस्वाल यांची निवड झाली असून विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य शेख एम.ए यांनी विद्यार्थी प्रतिनिधींना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी पर्यवेक्षक गायकवाड एन.एस,ज्येष्ठ शिक्षक पाटील ई.सी,समाजशास्त्र विभाग प्रमुख श्री खोकले युके,तडवी आय. बी,सौ हाके ए.पी,सौ शिर्के एस.ए , गवळी एन.एस, वसावे एस.ए. सहारे एल.पी,प्रसिद्धी विभाग प्रमुख कामडी व्ही.के, संतोष जंगम, देवमण घावट,आदी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी सहभागी होते.*



पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कॅक्व्ठ बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय – अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )